# जन वाचन आंदोलन




जनवाचन आंदोलन हे पुस्तकांना गावागावात घेऊन जाणारे आंदोलन आहे. नवसाक्षर व अर्धशिक्षित लोकांमध्ये पुस्तकांचे सामुदायिक वाचन करणे, ते ऐकणे आणि ऐकवणे हा याचा उद्देश आहे. आज गावातल्या लोकांपर्यंत पुस्तके पोचत नाहीत. त्यांची भाषा त्यांना उमगत नाही आणि किंमती परवडत नाहीत. अशा नववाचकांपर्यंत पुस्तके पोचवण्याचे काम भारत ज्ञान विज्ञान समितीने अंगिकारले आहे. ही पुस्तके प्रसिद्ध लेखकांची आणि सोपी, सुटसुटीत व स्वस्त किंमतीत असावीत असा प्रयत्न आहे.

या आंदोलनातून काय साध्य होईल?

गावागावात जनवाचनाची व जनवाचनालयांची संस्कृती निर्माण होईल. साक्षरता आंदोलनातून हस्तगत केलेली अक्षरकौशल्ये लोक स्वत: विकसित करू शकतील. त्यांच्या ज्ञानविज्ञानाच्या कक्षा विस्तारतील. त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक जाणिवांची पातळी उंचावू शकेल. आपल्या मूलभूत हक्कांच्या आणि एकंदर परिवर्तनाच्या लढ्यासाठी जागृत होऊन ते उभे ठाकू शकतील.

देशातील लोकशाही टिकण्यासाठी आणि अर्थपूर्ण होण्यासाठी हे आवश्यक आहे. साक्षरता म्हणजे केवळ अक्षर ओळख नव्हे तर संपूर्ण जग जाणण्याचे ते कार्य आहे. या दिशेने, गावागावातील लोकांच्या खांद्याला खांदा भिडवून, आम्ही पुढे जाऊ इच्छितो.




**भारत ज्ञान विज्ञान समिती**

# किस्से

## मुल्ला नसरुद्दीनचे

संकलन : विष्णू नागर
रुपांतर : विनया देशपांडे



**भारत ज्ञान विज्ञान समिती**

पुस्तकाचे नाव : किस्से मुल्ला नसरुद्दीनचे

संकलन : विष्णू नागर
रुपांतर : विनया देशपांडे

चित्रकार : विभास दास

निर्मिती सहाय्य : अमित नारकर/गणेश कांबळे

जवाआं/३१

प्रकाशन : जून १९९७

नववाचकांसाठी भारत ज्ञान विज्ञान समिती तर्फे राष्ट्रीय साक्षरता मिशनच्या सहकार्याने देशभर चालवल्या जात असलेल्या 'जनवाचन आंदोलन' मोहिमेसाठी प्रकाशित

मूल्य : २ रुपये ५० पैसे

© सर्वाधिकार भारत ज्ञान विज्ञान समिती (महाराष्ट्र)

प्रकाशक : दत्ता देसाई
राज्य समन्वयक, भारत ज्ञान विज्ञान समिती (महाराष्ट्र)
अक्षय, २१६, केळकर रस्ता, नारायण पेठ, पुणे ४११०३०
फोन : ४५६६९४
मुद्रण स्थळ : महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे ४११००४

अक्षर जुळणी व मांडणी : दिनानाथ मनोहर

# किस्से मुल्ला नसरुद्दीनचे

(नसरुद्दीन नावाचा माणूस खरंच होता का नाही कोणी सांगू शकत नाही. परंतु त्याचे किस्से जगभर प्रसिद्ध आहेत. आमच्या नवसाक्षरांच्या ते फार उपयोगी पडतील. हे किस्से सरळ साध्या शब्दात विष्णु नागर यांनी हिंदीत लिहिले आहेत.)

एके दिवशी एका प्रधानाने आपल्या बादशहासमोर मुल्ला नसरुद्दीनचे खूप कौतुक केले. त्याच्या गुणांचं वर्णन केलं. तो खूप हुशार आहे असं बादशहाला सांगितलं.



बादशहा म्हणाला, "ठीक आहे मी त्याला देखील आपला प्रधान बनवून टाकीन?" त्यानं मुल्ला नसरुद्दीनला बोलावणं पाठवलं. नसरुद्दीनला प्रधान करून टाकलं. बादशहा त्याला म्हणाला, "मला आपल्या प्रजेला सुखी आणि आनंदी करण्याची इच्छा आहे. काहीतरी उपाय सुचवा."

मुल्ला नसरुद्दीनचे उत्तर आले, "यावर एकच उपाय आहे. प्रजेचं शोषण करून तुम्ही जो खजिना जमा केला आहे, तो प्रजेला परत करा. प्रजा खूष होईल."

आपल्या नव्या प्रधानाकडून हे उत्तर ऐकून बादशहा थंड पडला.

❍ ❍ ❍

मुल्ला नसरुद्दीन बादशहाचा प्रधान म्हणून वावरू लागला. प्रत्येकजण त्याचा मित्र बनण्याची धडपड करू लागला.

कोणीतरी म्हणालं, ''मुल्ला नसरुद्दीन, तुम्ही किती नशिबवान आहात. तुमचा मित्र परिवार किती मोठा!''

मुल्ला नसरुद्दीन म्हणाले, ''आज तरी माझे पुष्कळ मित्र आहेत. पण खरे मित्र कोण हे तेव्हाच कळेल, जेव्हा मी प्रधान असणार नाही!''

❍ ❍ ❍

एक दिवस बादशहानं मुल्ला नसरुद्दीनला विचारलं, ''लोकांना सर्वात जास्त आनंद कधी होईल ते सांग.''

''तुम्ही स्वर्गवासी झालात तर,'' मुल्ला नसरुद्दीन पटकन् उत्तरला.

❍ ❍ ❍

एकदा मुल्ला नसरुद्दीनच्या डोळ्याला त्रास व्हायला लागला. प्रत्येक गोष्ट त्याला अंधुक अंधुक दिसायला लागली.

नेहमी मुल्ला नसरुद्दीन बादशहाची टर उडवायचा. आज मात्र बादशहाला चांगली संधी मिळाली. तो म्हणाला,''असं ऐकलं की तुला एकाच्या जागी दोन दोन गोष्टी दिसताहेत. अभिनंदन! तुझ्याजवळ एक गाढव आहे. आता ती तुला दोन दिसतील!''



मुल्ला म्हणाला, ''आपण अगदी खरं बोललात, महाराज. आपल्यालाही दोनच्या ऐवजी चार पाय आहेत असं दिसतयं मला.''

❍ ❍ ❍

बादशहा नसरुद्दीनवर नाराज होता. त्याची फजिती करण्याची बादशहानं ठरवलं. एके दिवशी सगळ्यांसमोर त्यानं जाहीर केलं, ''आजपासून आम्ही नसरुद्दीनला गाढवांचा बादशहा जाहीर करत आहोत.''

ते ऐकून बादशहाच्या दरबारातील सारे लोक हसायला लागले. परंतु नसरुद्दीन उठला. आपला गौरव केल्याबद्दल त्यानं बादशहाचे आभार मानले आणि मग बादशहाला म्हणाला, ''उठा, त्या गादीवर मला बसू द्या.''

हे ऐकून बादशहा भडकला, तो म्हणाला, ''हा काय उद्धटपणा चाललाय? तू माझ्या सिंहासनावर बसणार? तुझं डोकं तरी ठिकाणावर आहे ना?''

नसरुद्दीन म्हणाला, ''असा आरडाओरडा करू नका. एवढ्यातच तर आपण मला गाढवांचा बादशहा बनवलंत. मग ही गादी आजपासून माझी झाली.''

❍ ❍ ❍

एक दिवस बादशहा आणि मुल्ला नसरुद्दीन चेष्टा - मस्करी करत बसले होते. पण अचानक बादशहा गंभीर झाला. त्यानं विचारलं, ''मुल्ला नसरुद्दीन, मला सांग, मेल्यावर मी स्वर्गात जाईन की नरकात?''

मुल्ला नसरुद्दीन म्हणाला, ''त्यात काय शंका? नरकातच!''

ते ऐकून बादशहा संतापला. त्यानं नसरुद्दीनला खूप सुनावलं. त्याला चांगला फैलावर घेतला.

मुल्ला म्हणाला, ''हुजूर माफ करा. पण खरं सांगू? स्वर्गात जाण्यासाठी लायक असलेल्या इतक्या लोकांना आपण मारून टाकलंत की त्या लोकांनी स्वर्ग आता खचाखच भरून गेलाय. तिथं आपल्यासाठी जागाच शिल्लक नाही.''

○ ○ ○



एक दिवस नसरुद्दीनला बादशहा म्हणाला, ''असं काहीतरी काम सांग, जे केल्यामुळं मेल्यावर मला स्वर्गात जाता येईल.''

नसरुद्दीन म्हणाला, ''महाराज, रात्र - दिवस झोप काढा.''

बादशहा नाराज होऊन म्हणाला, ''काय बोलतोस? झोपून कधी कुणाला स्वर्ग मिळाला आहे का?''



नसरुद्दीन म्हणााला, ''सर्वांना नाही मिळत. पण आपल्याला नक्की मिळेल. झोपल्यामुळं तुमच्या हातून पाप तरी घडणार नाही ना!''

○ ○ ○

एके दिवशी बादशहा नसरुद्दीनला म्हणाला, ''माझ्या तोंडावर लोक माझं गुणगान करतात. पण माझी पाठ वळताच मला शिव्याशाप देतात. असं का?''

नसरुद्दीन म्हणाला, ''त्याचं कारण साधं आहे. आपण बोलता एक आणि करता दुसरंच. त्यामुळं लोकसुद्धा आपल्याशी तसंच वागणार, नाही का?''

○ ○ ○

एकदा राणी गरोदर राहिली.

बादशहानं मुल्लाला विचारलं, ''तू ज्योतिषी आहेस. सांग माझ्या राणीला मुलगा होणार की मुलगी?''

''मुलगी'' मुल्ला नसरुद्दीननं उत्तर दिलं.

बादशहा म्हणाला, ''मुलगी आमच्या काय कामाची? मुलगा असेल तर गादीला वारस मिळेल. मुलगी झाली तर हे सिंहासन रिकामंच राहील!''

नसरुद्दीन म्हणाला, ''चांगलं होईल. प्रजा सुखानं नांदेल.''

○ ○ ○

एकदा बादशहा आणि मुल्ला नसरुद्दीन दोघं बरोबर फिरायला निघाले. बादशहानं मुल्लाला विचारलं. ''बाजारात जर मला गुलाम म्हणून विकलं तर किती किंमत येईल?''

मुल्ला नसरुद्दीन म्हणाला, ''एक लाख रुपये!''

बादशहा म्हणाला, ''तू मूर्ख आहेस. तुझी अक्कल शेण खायला गेली आहे काय? एक लाख रुपये तर माझ्या गळ्यातील हाराची किंमत आहे.''

मुल्ला म्हणाला, ''बरोबर आहे. तुम्हाला विकत घेणारे तुमची नाही, फक्त हाराचीच किंमत देतील.''

❍ ❍ ❍

मुल्ला नसरुद्दीनचा दावा होता की, त्याला पक्ष्यांची भाषा समजते. बादशहाला हे माहिती होतं. एक दिवस तो मुल्ला नसरुद्दीनला आपल्या बरोबर शिकारीला घेऊन गेला.

रस्त्यात एक पडका वाडा दिसला. त्या वाड्याचा काही भाग शिल्लक होता. तेथील पडक्या भिंतीवर दोन घुबडं बोलत बसली होती.

बादशहा म्हणाला, ''मुल्ला, ही घुबडं काय बोलताहेत रे?''

मुल्ला म्हणाला, ''हुजूर, हे म्हणतायत की, हे बादशहा! तू सावध हो. प्रजेवर अत्याचार करणं बंद कर नाहीतर तुझ्या राज्याचीही या वाड्यासारखीच गत होईल.''

❍ ❍ ❍

बादशहाच्या महालाच्या भिंती आणखी उंच करण्याचं काम चालू आहे असं मुल्ला नसरुद्दीनला दिसलं. एक प्रधान त्या कामावर देखरेख करत होता.

नसरुद्दीनने त्या प्रधानाला विचारलं, ''अरे, भिंती एवढ्या उंच करण्याचं कारण काय?''



प्रधान म्हणाला, ''साधी गोष्ट आहे. भिंती उंच केल्या म्हणजे महालात चोर शिरू शकणार नाहीत. सोने-चांदी, हिरे-मोती यांची चोरी थांबेल.''

नसरुद्दीन म्हणाला, ''यामुळे बाहेरचे चोर येणं बंद होईल हे खरं. पण आतल्या चोरांना कसं थांबवणार?''

❍ ❍ ❍



एके दिवशी भल्या सकाळी बादशहा मुल्ला नसरुद्दीनला म्हणाला, ''आज सकाळी मी आरशात स्वत:चा चेहरा बघत होतो. खरंच, दिसायला मी खूप कुरुप आहे. आता मी कधीही आरशात माझा चेहरा बघणार नाही.''

नसरुद्दीन लगेच म्हणाला, ''आपण एक दिवस आपला

चेहरा पाहून घाबरलात. मला तर रात्रंदिवस तो बघावा लागतो. विचार करा, माझे काय हाल होत असतील?''

○ ○ ○

मुल्ला नसरुद्दीन खूप नावाजलेला हकीम होता. गावोगावी जाऊन तो लोकांवर इलाज करायचा.

त्याला त्रास देण्याचा एका शेठचा विचार चालला होता. तो नसरुद्दीनला म्हणाला, ''काल रात्री मी झोपलो होतो, तेव्हा माझं तोंड उघडं राहिलं. त्यावेळी माझ्या पोटात उंदीर गेला.''

नसरुद्दीन म्हणाला, ''मांजरीला गिळून टाका. ती मांजर त्या उंदराला खाऊन टाकेल!''

○ ○ ○

बादशहाचा मुख्य प्रधान आजारी पडला. त्यानं भारीतले भारी इलाज केले. पण तरीही तो बरा होईना. मग नाईलाजानं त्यानं नसरुद्दीनला बोलावणं धाडलं.

प्रधानसाहेब बिछान्यावर झोपले होते. नसरुद्दीननं काही वेळ वाट पाहिली. प्रधान उठण्याचं लक्षण दिसेना. तेव्हा कंटाळून तो प्रधानांच्या नातेवाईकांना म्हणाला, ''मी मयत माणसावर उपाय करू शकत नाही.''

नातेवाईक म्हणाले, ''पण हे तर जिवंत आहेत?''

नसरुद्दीन म्हणाला, ''पण यांचं हृदय तर मेलेलं आहे. ज्याचं हृदय मेलेलं आहे, तो जिवंत राहून काय उपयोग?''

○ ○ ○



मुल्ला नसरुद्दीनला त्याच्या मित्रानं जेवायला बोलावलं. नसरुद्दीन जुने, फाटके कपडे घालून गेला. मित्रानं नसरुद्दीनला घरातून हाकलून दिलं. तो म्हणाला, ''माझी इज्जत घालवू नकोस. पंगतीत बसून जेवायचं तर चांगले भारी कपडे घालून ये.''

दुसऱ्यावेळी नसरुद्दीन भारी कपडे घालून गेला. मित्रानं त्याचं चांगलं स्वागत केलं. त्याला नीट जेवायला वाढलं.''



पण हे काय! नसरुद्दीन आपल्या कपड्यानाच जेवायला घालू लागला. मित्र म्हणाला, ''हे काय करतोस? वेडा बिडा झालास काय? कपडे कधी जेवण करतात का?''

मुल्ला नसरुद्दीन म्हणाला, ''तू कपड्यांना जेवायला बोलावलं होतंस. मला नाही. त्यांनाच जेवण देतोय.''

○ ○ ○

एकदा नसरुद्दीनला त्याच्या दोस्तानं जेवायला बोलावलं. आणखीनं बऱ्याच लोकांना जेवायला बोलावलं होतं. नसरुद्दीनच्या जवळ बसलेला पाहुणा गपागपा खात होता. जेवता जेवता पक्वान्नं आपल्या खिशात भरून घेत होता.

नसरुद्दीननं पाण्याचं भांडं उचललं आणि तो त्या पाहुण्याच्या खिशात पाणी ओतू लागला.

पाहुणा म्हणाला, ''हे काय करतोस? निर्लज्ज कुठला.''

नसरुद्दीन म्हणाला, ''घाबरू नकोस. तुझ्या खिशानं इतक्या वेळात खूप खाल्लयं, त्याला आता तहान लागली आहे. त्याला जरा पाणी पाजतोय.''

○ ○ ○

मुल्ला नसरुद्दीनचा लहानपणीचा एक मित्र होता. तो खूप मोठा हकीम झाला. नसरुद्दीन त्याला भेटायला गेला. मित्रानं ओळख दाखवली नाही. खरं म्हणजे दोस्तानं त्याला ओळखलं होतं. परंतु गरीब नसरुद्दीनला मित्र म्हणायची त्याला लाज वाटत होती. तो नसरुद्दीनला म्हणाला, ''कोण आहेस तू? तुला काय पाहिजे?''

ते ऐकून नसरुद्दीनला फार राग आला. त्यानं रागातच उत्तर दिलं, ''मी मुल्ला नसरुद्दीन आहे. तुझा लहानपणीचा जिगरी दोस्त. कोणीतरी म्हणालं की तू आंधळा झालास, म्हणून तुझी सेवा करायला आलो आहे.''

○ ○ ○

एकदा मुल्ला नसरुद्दीन तलावाच्या काठी हातपाय धूत होता. तेवढ्यात एक शेठजी तिथे आला. चुकून त्याचा पाय घसरून तो तलावात पडला.



एक माणूस त्या शेठना म्हणाला, ''आपला हात आपण मला द्या, मी आपणाला बाहेर काढतो.'' परंतु शेठवर त्याचा काहीच परिणाम झाला नाही. त्यांनी आपला हात दिला नाही.



ते पाहून नसरुद्दीननं ओळखलं, तो म्हणाला, ''ते हात कसा देणार? त्यांनी नेहमी घेण्याचं काम केलयं. देण्याचं नाही!'' असं म्हणून नसरुद्दीन त्यांच्याजवळ गेला. आपला हात पुढे करून म्हणाला, ''शेठजी, माझा हात घ्या, मी तुम्हाला बाहेर काढतो.''

हे ऐकल्याबरोबर शेठजीनी नसरुद्दीनचा हात पकडला आणि ते बाहेर आले.

○ ○ ○

गावात एक नवा काझी आला होता. मुल्ला नसरुद्दीनसमोर कुणीतरी त्याची खूप वाहवा केली. मुल्लाला तो म्हणाला,''ऐकलत का? नवा काझी तुमच्यापेक्षाही हुषार आहे म्हणे. त्याच्या मेंदूत अक्कल अगदी ठासून भरली आहे.''

मुल्ला नसरुद्दीन म्हणाला, ''खरंच आहे. काझी आपल्या अकलेचा उपयोग करत नाहीत त्यामुळे त्यांची अक्कल काही खर्चच होत नाही. मग अक्कल मेंदूत ठासून भरलेली नसेल तर काय?''

○ ○ ○

एक माणूस मुल्ला नसरुद्दीनकडं सल्ला घ्यायला आला. त्यानं विचारलं, '' मला सांगा, आपण ताबूतच्या पुढं असायला पाहिजे की मागे?

मुल्ला नसरुद्दीन म्हणाला, ''पुढे रहा किंवा मागं, काही फरक पडत नाही. फक्त ताबूतच्या आत राहिलं तर मात्र फरक पडतो.''

○ ○ ○

एक दिवस एक चोर मुल्ला नसरुद्दीनच्या घरी आला. त्याला बघून मुल्ला नसरुद्दीन एका पेटाऱ्यात लपून बसला.





चोरानं घरातील कानाकोपरा धुंडाळला. त्याला काही मिळालं नाही. शेवटी त्यानं पेटारा उघडला, तर त्यात नसरुद्दीन बसला होता.

चोरानं विचारलं, ''तू पेटाऱ्यात का लपून बसलास?''

नसरुद्दीन बोलला, ''कारण की मी गरीब आहे. तुला नेण्याच्या लायकीचे माझ्या घरात काहीच नाही. तुला येताना पाहिल्यावर मला खूप लाज वाटली आणि म्हणून मी जाऊन पेटाऱ्यात लपून बसलो.''

❁❁❁❁❁